# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

## जिल्हाधिकारी कार्यालय कंत्राटी पदभरती - 2020 (सुरक्षा रक्षक)

जाहिरात क्रमांक/गौणख/ई-कावि/2020/8/26/170 दिनांक 20/02/2020

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष (सुरक्षा रक्षक) कंत्राटी पदभरती निवड समिती, जळगांव यांचे मार्फत शासन निर्णय क्र. गौखनि-10/0219/प्र.क्र.09/ख-1 दिनांक 3 सप्टेंबर 2019 नुसार अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना अंतर्गत वाळूसाठ्यांचे संरक्षण करणे आणि क्षेत्रीय अधिका-यांच्या संरक्षणासाठी सुरक्षा रक्षकांची तात्पुरत्या स्वरुपातील सेवा अनुबंधानुसार (कंत्राटी पध्दतीने) एकत्रित मानधन तत्वावर जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी जळगांव व उपविभागीय अधिकारी पाचोरा यासाठी रात्रपाळी करीता खालील अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदरावांकडून **एकूण 3 जागांकरिता** अर्ज मागविण्यांत येत आहेत.

1. उमेदवार मिलिटरी/पॅरा मिलिटरीमधून सेवानिवृत्त झालेला असावा.
2. उमेदवाराकडे स्वतःची गन असावी.
3. उमेदवाराकडे अग्नीशस्त्र बाळगण्याचा परवाना असावा.
4. उमेदवाराचे वय दिनांक 1 मार्च, 2020 रोजी 50 वर्षापेक्षा कमी असावे.
5. जळगांव जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात काम करण्याची तयारी असावी.
6. सेवेचा कालावधी संध्याकाळी 6 वाजेपासुन रात्रपाळीसाठी राहील.
7. शारीरिक चाचणी उत्तीर्ण करणे आवश्यक.
8. नियुक्ती मानधन तत्वावर तात्पुरती सेवा एकत्रीत रु. 10000/- प्रति माह
9. नेमणूक करणे वा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे राहतील
10. उमदेवार जळगांव व पाचोरा तालुक्यातील स्थानिक असलस्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल (कारण नियमीत सेवे व्यतीरिक्त आवश्यकतेनुसार त्यांना सेवेसाठी त्वरीत बोलविण्यात येईल)

वरील अटी व शर्तीनुसार उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत असून खालील कागदपत्रांसोबत अर्ज सादर करण्यांत यावेत.

1. जन्म दाखला, 2. सेवा निवृत्ती आदेश, 3. रहिवासी पुरावा, 4. उमेदवाराकडे गन असल्याचा पुरावा, 5. अग्नी शस्त्र बाळगण्याचा परवाना ई. अर्जासोबत जोडणे आवश्यक
2. अर्ज को-या कागदावर टाईप करुन सादर करावा ज्यामध्ये खालील बाबी समाविष्ट राहतील. 1.पूर्ण नांव 2. रहिवासी/पत्रव्यवहाराचा पत्ता 3. जन्मतारीख 4. सेवानिवृत्तीचा दिनांक 5. कोणत्या बटालीयनमधून सेवानिवृत्त झाले 6.अग्नीशस्त्र बाळगण्याचा परवाना क्रमांक

| | |
|---|---|
| दिनांक 24/02/2020 ते 03/03/2020 | :- इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकृत करणे कार्यालयीन दिवशी वेळ 11.00 ते 5.00) |
| दिनांक 05/03/2020 | :- प्राप्त अर्जाची छाननी करणे |
| दिनांक 11/03/2020 | :- मुलाखती घेणे |
| दिनांक 13/03/2020 | :- पात्र उमेदवारांची शारीरिक चाचणी करीता निवड यादी प्रसिध्द करणे |

टिप :- अर्जाचा नमूना www.jalgaon.nic.in ह्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आला आहे.

अर्ज जिल्हा खनिकर्म शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव येथे कार्यालयीन दिवशी सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत स्विकारले जातील.

मा.जिल्हाधिकारी यांचे
मंजुर टिपणीनुसार }

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष (सुरक्षा रक्षक)
कंत्राटी पदभरती निवड समिती, जळगांव
करीता

# <u>सुरक्षा रक्षकाच्या जागेकरिता अर्ज</u>

| उमेदवाराचे नुकतेच काढलेले छायाचित्र |
|---|

प्रति,

मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जळगांव

1. उमेदवाराचे नांव :- ---------------------------------------------------------------------------

2. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

3. जन्म तारीख :- ---------------------------------------------------------------------------

4. दिनांक 1 मार्च, 2018 रोजीचे वय :- -----------------------------------------------------------------

5. मिलिटरी/पॅरामिलिटरीमधून निवृत्त झाल्याचा दिनांक :- --------------------------------------------

6. अग्नीशस्त्र असल्याबाबत पुरावा :- ----------------------------------------------------------------

7. अग्नीशस्त्र बाळगण्याचा परवाना क्रमांक :- ------------------------------------------------------

अर्जदाराची स्वाक्षरी

**सोबत जोडावयाची कागदपत्रे**

1. जन्म तारखेचा दाखला
2. सेवा निवृत्ती आदेशाची प्रत
3. पॅन कार्ड/आधारकार्ड
4. अग्नीशस्त्र बाळगण्याचा परवाना छायाप्रत

(टिप :- संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज खनिकर्म शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव येथे सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत कार्यालयीन दिवशी दिनांक 24/02/2020 ते 03/03/2020 या कालावधीत स्विकारल्या जातील.)